नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/06/2023 (मंगळवार) सकाळ

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन देवलापारची कार्यवाही

दिनांक २६/०६/२०२३ रोजी पोलीस स्टेशन देवलापार येथील स्टाफ रामटेक उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे देवलापार हद्दीतील ०८ किमी अंतरावर मौजा बेलदा शिवार येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची ट्रॅक्टर व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोलीस स्टेशन देवलापार येथील बेलदा शिवार येथे नाकाबंदी करून १) ट्रॅक्टर क्रमांक एम. एच.— ४० बी.जे.— ८९२३ च्या चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात टिप्पर चालक **आरोपी नामे— संदिप मायाराम कुंभरे वय ३२ वर्षे रा. वार्ड क्रमांक ३ बेलदा ता. रामटेक** हा टिप्परमध्ये बिना रॉयल्टी अवैधरीत्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने त्यांच्या ताब्यातून टॅक्टर क्रमांक एम. एच.— ४० बी. जे.— ८९२३ अंदाजे किंमती ४,००,०००/— रू. ज्यामध्ये १ ब्रास रेती किंमती ३,०००/— रू. असा एकुण किंमती अंदाजे ४,०३,०००/— रूपयाचा मुद्देमाल तसेच २) ट्रॅक्टर क्र. एम. एच.— ४०/सी.क्यु.— १३८२ अंदाजे किमंती ६,००,०००/— रू. चा चालक **आरोपी नामे— नितेश नारायणजी मोरगडे, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, बेलदा ता. रामटेक** याने आपल्या वाहनात १ ब्रास रेती किंमती ३,०००/— रू. एकुण किमंती ६,०३,००० रूपयाचा मुद्देमाल असा एकुण दोन्ही वाहनातील ०२ ब्रास रेती एकुण किंमती अंदाजे ६,०००/—रू. दोन्ही वाहनासह एकुण १००६०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोलीस नायक विजय किसनराव परमेश्वर ब. नं. २०० पोस्टे देवलापार यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शरद गायकवाड पोस्टे देवलापार मो. नं. ७०२१०१८०३७ हे करीत आहे.






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर